
# नांदेड शहर

प्रजावाणी • मंगळवार, दि. १० डिसेंबर २०२४ ५


### कृषी • मॅग्रेट प्रकल्पांतर्गत 'केळी उत्तम कृषीपद्धती' विषयावर प्रशिक्षण

# नांदेड जिल्हा निर्यातक्षम केळी उत्पादक शेतकऱ्यांचा हब बनविणार



प्रतिनिधी • नांदेड

## जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांचे प्रतिपादन

मॅग्रेट प्रकल्पा अंतर्गत नांदेड, परभणी व हिंगोली या तीनही जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी केळी निर्यातीसाठी मॅग्रेट प्रकल्पांतर्गत आवश्यक ती सर्व मदत केली जाईल असे मॅग्रेट प्रकल्पाचे अतिरिक्त प्रकल्प संचालक डॉ.अमोल यादव यांनी आश्वासित केले. केळी निर्यातीसाठी आवश्यक ती सर्व मदत त्यासाठी लागणारी ऑनलाइन नोंदणी याविषयी कृषी विभाग मार्गदर्शन व मदत करेल असे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी सांगितले.

अलिकडच्या काळात शेतकऱ्यांनी पारंपारिक पीक पद्धती सोडून निर्यातक्षम केळी उत्पादकतेवर भर द्यावा. तसेच शेतीसह शेतमाल प्रक्रिया उद्योगाकडे वळावे. उत्पादित केलेला पक्का शेतमाल निर्यात करण्याकडे भर द्यावा, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले.

जिल्हा नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालयात नुकतेच सहकार व पणन विभाग अंतर्गत आशियाई विकास बँक अर्थसहाय्यीत महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्रेट) प्रकल्प अंतर्गत महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ पुणे, कृषी व आत्मा विभाग नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने केळी उत्तम कृषी पद्धती या विषयावर प्रशिक्षणाचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास मॅग्रेट प्रकल्प पुण्याचे अतिरिक्त प्रकल्प संचालक डॉ. अमोल यादव, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत, प्रकल्प संचालक आत्मा शिरफुले, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ पुणेचे मनुष्यबळ विकास तथा वरिष्ठ प्रशिक्षण अधिकारी हेमंत जगताप, प्रकल्प उपसंचालक मॅग्रेट लातूर महादेव बरडे, विभागीय प्रकल्प अधिकारी मॅग्रेट, केळी संशोधनाचे प्रभारी अधिकारी डॉक्टर शिवाजी शिंदे, पोखर्णी कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. देविकांत देशमुख, संचालक के डी एक्सपोर्ट सोलापूर किरण डोके, उपसरव्यवस्थापक महाकृषी शेतकरी उत्पादक कंपनी सोलापूर नरहरी कुलकर्णी, बारड शितलादेवी शेतकरी उत्पादक कंपनीचे अध्यक्ष निलेश देशमुख, बारडकर, हिरकणी बायोटेकचे रत्नाकर देशमुख, विभागीय अधिकारी सोमनाथ जाधव, गजेंद्र नवघरे, अक्षय हातागळे आदी उपस्थित होते. एमसीडीसीला लातूर विभागामध्ये केळी पिक प्रशिक्षण घेण्यासाठी मॅग्रेट प्रकल्पाने संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल प्रकल्पाचे हेमंत जगताप यांनी आभार मानले. किरण डोके यांनी निर्यातक्षम केळी पीक लागवड तंत्रज्ञानातील विविध बारकावे समजून सांगितले. निलेश देशमुख यांनी निर्यातक्षम केळी पिकाची वाव व संधी याविषयी मार्गदर्शन केले. नरहरी कुलकर्णी यांनी केळी लागवडीमधील खत व पाणी व्यवस्थापन व निर्यातक्षम उत्पादन याविषयी मार्गदर्शन केले. गणेश पाटील यांनी ग्लोबल गॅप प्रमाणिकरण व फ्रुट केअर योजना याविषयी सविस्तर माहिती दिली.